इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद

**<u>मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात</u>**

**<u>नागपूर खंडपीठ : नागपूर</u>**

**<u>रिट याचिका क्र. १३२५/२०१८</u>**

साजिद एस. खान आणि इतर एक

........ विरुद्ध ........

महाराष्ट्र राज्य आणि इतर

---

कार्यालयीन टिप्पणी, न्यायमंचाचे, उपस्थितीचे, न्यायालयाचे न्यायालय किंवा न्यायाधीशांचे आदेश निर्देश संबंधी आदेश आणि प्रबंधकाचे आदेश यासंबंधीचे कार्यालयीन ज्ञापन

---

श्री. एस. पी. भांडारकर, याचिकाकर्त्यांचे वकील

श्री. ए. एम. देशपांडे, अतिरिक्त सरकारी वकील यांचे सोबत मिस एन. पी. मेहता, सहाय्यक सरकारी वकील, उत्तरवादी क्रमांक १ ते ४ साठी

श्री. के. पी. महल्ले, उत्तरवादी क्र. ५ चे वकील

**<u>न्यायमंच : न्यायमूर्ती सुनील बी. शुक्रे, झेड. ए. हक आणि मनिष पितळे</u>**

**<u>राखून ठेवल्याचा दिनांक : १०/१२/२०२०</u>**

**<u>घोषित केल्याचा दिनांक : ०५/०१/२०२१</u>**

<u>आदेश ( न्यायमूर्ती झेड. ए. हक द्वारे ):-</u>

१] या न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ (थोडक्यात, "१९६६ ची संहिता") च्या कलम ४८(७) आणि ४८(८) चा अर्थ लावण्यासंदर्भात या न्यायालयाच्या दुसऱ्या द्विसदस्यीय खंडपीठाने यापूर्वी घेतलेल्या मताशी सहमत होण्यास असमर्थता व्यक्त करून माननीय मुख्य न्यायमूर्तींना या मुद्द्यावर विचार

करण्यासाठी एक पूर्ण न्यायाधीश मंडळ स्थापन करण्याची विनंती केली. पूर्ण न्यायाधीश मंडळाच्या स्थापनेसाठी हे प्रकरण माननीय मुख्य न्यायमूर्तींकडे पाठवताना, संदर्भाकरिता विशिष्ट मुद्दा तयार करण्यात आला नव्हता, तथापि संदर्भ आदेशाचे वाचन केल्यावर हे स्पष्ट होते की, न्यायमूर्ती श्री. बी.पी. धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती श्री. अरुण डी. उपाध्ये यांच्या द्विसदस्यीय खंडपीठाने न्यायमूर्ती श्री. आर. के. देशपांडे आणि न्यायमूर्ती श्री. एम. जी. गिरटकर यांचा समावेश असलेल्या दुसऱ्या द्विसदस्यीय खंडपीठाने फौजदारी रिट याचिका क्र.११०५/२०१७ मधील निकालाच्या परिच्छेद क्रमांक ६ मध्ये नोंदविलेले मत स्वीकार करण्यास असमर्थता दर्शविली. फौजदारी रिट याचिका क्र.११०५/२०१७ मध्ये दिलेल्या निकालाच्या परिच्छेद क्रमांक ६ मध्ये पूर्वीच्या द्विसदस्यीय खंडपीठाने याचिकाकर्त्याचा युक्तिवाद मान्य केला की, १९६६ च्या संहितेतील कलम ४८(७) आणि ४८(८) च्या तरतुदींनुसार, जर गौण खनिजाच्या उत्खननाचा अधिकार असलेला अभिहस्तांकिती हा वाहक नसून वेगळी व्यक्ती असेल, तर खनिज (गौण खनिज) वाहकाचे विरुद्ध गुन्हा दाखल करता येणार नाही, जोपर्यंत असे दर्शविण्यात येणार नाही की, अभिहस्तांकितीद्वारे वाळू (गौण खनिज) चे उत्खनन अनधिकृत आणि बेकायदेशीर आहे. पूर्वीच्या द्विसदस्यीय खंडपीठाने पुढे असे निर्णय दिले की, १९६६ च्या अधिनियमाच्या कलम ४८(७) आणि ४८(८) मधील तरतुदी, प्राधिकाऱ्यांना वाहनाद्वारे वाहून नेण्यास परवानगी दिलेल्या वजनापेक्षा जास्त वजनाचे खनिज (गौण खनिज) वाहून नेणाऱ्या वाहनांना जप्त करण्याचे आणि सरकार जमा करण्याचे अधिकार देत नाही.

पूर्ण न्यायाधीश मंडळाने विचारार्थ घेतलेला मुद्दा संदर्भ आदेशात नमूद नसल्यामुळे, या प्रकरणात उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, दिनांक २४/११/२०२० रोजीच्या आदेशानुसार, आम्ही खालील मुद्दे विचारार्थ तयार केले आहेतः-

> “(I) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४८ मधील तरतुदी "गौण खनिजांच्या" बाबतीत लागू होतील काय ?

(II) गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करणे, ते हलविणे व त्याची वाहतूक इत्यादींचे संदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४८ मधील किंवा खाण आणि खनिज (विकास आणि विनियमन) अधिनियम, १९५७ अंतर्गत तयार केलेल्या महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास आणि विनियमन) नियमावली, २०१३ मध्ये समाविष्ट असलेल्या तरतुदींच्या उल्लंघनासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८ मध्ये किंवा २०१३ च्या नियमावलीतील नियम ७८ मध्ये समाविष्ट सदर दोन भिन्न तरतुदींच्या संचापैकी कोणती तरतूद अधिभावी होईल ?"

तदनुसार, विद्वान वकिलांनी आपले म्हणणे मांडले.

२] संबंधित तथ्ये अशी आहेत:-

दिनांक ०१/०२/२०१८ रोजी याचिकाकर्त्यांच्या मालकीचे असल्याचे अभिकथित असलेल्या चार वाहनातून राजुरा, जिल्हा चंद्रपूर जवळील वाळू घाटातून आदिलाबादकडे वाळूची वाहतूक करण्यात येत होती. नायब तहसीलदार, राजुरा यांनी सदर वाहने थांबविली. त्यावेळी संबंधित सर्व कागदपत्रे सादर करण्यात आली आणि नायब तहसीलदार द्वारे त्याची पडताळणी करण्यात आली, परंतु तरी सदर वाहने ताब्यात घेण्यात आली. याचिकाकर्त्यांचा असा दावा आहे की ते वाहतुकीचा व्यवसाय करतात आणि उत्तरवादी क्र. ५ सोबत झालेल्या करारानुसार ते वाळू वाहतूक करत होते आणि याचिकाकर्त्यांनुसार त्यांच्याकडे मुधोली तुकूम येथील घाटातून वाळू उत्खनन करण्याचा वैध परवाना होता. याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्याकडे दररोज पाच ब्रास वाळू वाहतुकीसाठी वैध परवाना होता आणि नायब तहसीलदारांनी वाहनांमध्ये अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात वाळू वाहतूक होत असल्याच्या कारणावरून वाहनांना ताब्यात घेतल्याची कारवाई बेकायदेशीर आणि अन्यायकारक आहे.

उत्तरवादी-प्राधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, वाहनचालकांनी सादर केलेल्या वाहतूक परवान्यात वाहतूक परवान्याचा पावती क्रमांक, वाहतूक परवान्याच्या वैधतेची कालावधी, वाहतूक परवाना जारी करण्याची तारीख आणि वाहतूक परवान्यांची मुदत संपण्याची तारीख दर्शविण्यात आलेली नाही.

काहीही असो, आम्हाला या प्रकरणाच्या गुणवत्तेवर आधारित युक्तिवादाच्या सामोरे जाण्याची आवश्यकता नाही आणि केवळ वाद समजून घेण्यासाठी आणि निर्देशनाला उत्तर देण्यासाठी तथ्ये पुनरुत्पादित केली जातात.

३] याचिकाकर्त्यांच्या विद्वान वकिलांनी असे मांडण्यासाठी सविस्तर निवेदन केले आहे की, जर वाहतूकदार खाण भाडेपट्ट्याच्या धारकाशी करारावर वाळूची वाहतूक करत असल्याचे आढळले, तर १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(७) आणि ४८ (८) मधील तरतुदी लागू होणार नाही आणि परिणामी, वाहतूकदाराने या तरतुदींचे उल्लंघन केले आहे या आधारावर संहितेच्या कलम ४८(७) आणि ४८(८) अंतर्गत त्याचे विरुद्ध कारवाई केली जाऊ शकणार नाही. असा युक्तिवाद केला जातो की ज्यांच्या सांगण्यावरून वाळूची वाहतूक केली जात होती, त्या खाण भाडेपट्ट्याच्या धारकाविरुद्ध कारवाई केली जाणार नाही आणि म्हणूनच केवळ याचिकाकर्त्यांविरुद्ध म्हणजेच वाहतूकदारांविरुद्ध कारवाई करणे हे बेकायदेशीर आणि कायद्याच्या विरुद्ध आहे.

४] या युक्तिवादाला पाठिंबा देण्यासाठी खाण आणि खनिज (विकास आणि विनियम) अधिनियम, १९५७ (थोडक्यात, "१९५७ चे अधिनियम") च्या तरतुदींवर विशेषतः १९५७ च्या अधिनियमाच्या कलम ४ ते १५, २१, ७९, ८०, ८१ आणि ८२ वर विश्वास दर्शविला आहे. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास आणि विनियम) नियमावली, २०१३ (थोडक्यात, "२०१३ ची नियमावली") च्या नियम ७९ वर देखील विश्वास दर्शविला आहे.

५] आम्ही ज्या मुद्यांचा विचार करीत आहोत, त्यावरील याचिकाकर्त्यांचे युक्तिवाद पुढीलप्रमाणे आहे :-

(i) १९६६ ची संहिता तेव्हाच लागू होईल जेव्हा जमीन महसूलाच्या आकारणीचा आणि वसुलीचा प्रश्न उद्भवतो आणि जेव्हा सरकारी जमिनीवरील अधिकार खाजगी व्यक्तीला दिला जातो तेव्हा तरतुदी लागू करता येत नाहीत.

(ii) १९५७ चा अधिनियम आणि २०१३ ची नियमावली जे १९५७ च्या अधिनियमाच्या कलम १५ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा चा वापर करुन तयार करण्यात आलेले आहेत, ते संपूर्णतः संहिता आहेत आणि त्यातील तरतुदी गौण खनिजांच्या उत्खननासाठी परवाने देण्याच्या पैलूंशी उत्खनन केलेल्या गौण खनिजांच्या वाहतुकीसह संबंधित बाबींशी आणि उल्लंघन/उल्लंघन केल्यास दंडाशी संबंधित आहेत.

(iii) १९५७ चा अधिनियम आणि २०१३ ची नियमावली, हे गौण खनिजांशी संबंधित बाबींच्या विनियमासाठी विशेष अधिनियम असल्यामुळे, १९६६ च्या संहितेच्या तरतुदींवर अधिभावी असेल जो या प्रकरणातील एक सामान्य कायदा आहे.

याचिकाकर्त्यांचे वकील श्री. एस. पी. भांडारकर यांनी खालील न्यायनिर्णयांवर विश्वास दर्शविला आहे :-

(अ) **(२००८) ३ एस.सी.सी. चे पृष्ठ ६७४ वर प्रकाशित** माननीय सर्वोच्च न्यायालयाने सुरेश नंदा -विरूद्ध- सी.बी.आय. च्या प्रकरणात दिलेला न्यायनिर्णय.

(ब) **(२०१७) २ एस.सी.सी. चे पृष्ठ १८ वर प्रकाशित** माननीय सर्वोच्च न्यायालयाने शरत बाबू दिगुमारती -विरुद्ध- सरकार (राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली) या प्रकरणात दिलेला न्यायनिर्णय.

हे निदर्शनास आणून देण्यात येते की, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या७ सदस्यीय पीठाने **(१९९०) १ एस. सी.सी. चे पृष्ठ १२ वर प्रकाशित** *इंडिया सिमेंट लिमिटेड आणि इतर -विरुद्ध- तामिळनाडू राज्य आणि इतर* या प्रकरणामध्ये दिलेला न्यायनिर्णय पूर्ण

न्यायाधीश मंडळाकडे पाठविला आहे आणि गौण खनिजांशी संबंधित प्रकरणे हाताळण्यासाठी राज्य विधानमंडळाच्या सक्षमतेचा पूर्ण न्यायाधीश मंडळासमोर प्रलंबित आहे.

६] अधिवक्ता श्री. ए. वाघधरे आणि श्री. व्ही.बी. भिसे या प्रकरणात कोणत्याही पक्षाचे प्रतिनिधित्व करत नसले, तरी त्यांनी याचिकाकर्त्यांचे वकील श्री. एस. पी. भांडारकर यांनी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने आपले म्हणणे मांडले.

७] श्री. ए. एम. देशपांडे, विद्वान अतिरिक्त सरकारी वकील यांनी १९५७ च्या अधिनियमाच्या कलम ४ ते १५ आणि २१ आणि २०१३ च्या नियमावलीच्या नियम ७०, ७१ आणि ७८ मधील तरतुदींचे संदर्भ देऊन असे सादर केले की, २०१३ ची नियमावली आणि १९६६ ची संहिता वेगवेगळ्या परिस्थितीत कार्य करतात. असे सादर करण्यात येते की, २०१३ च्या नियमावलीतील नियम ७० मध्ये असे नमूद केले आहे की लिलावाची प्रक्रिया, विल्हेवाट, लिलावकर्तासोबत अटी व शर्ती इत्यादि सरकारने कार्यकारी सूचनांद्वारे विनिर्दिष्ट केली पाहिजे, जे सध्याच्या प्रकरणात, २०१३ च्या नियमावलीतील नियम २(म) प्रमाणे महाराष्ट्र शासन आहे आणि तदनुसार, महाराष्ट्र शासन वेळोवेळी लिलाव, विल्हेवाट, लिलावकर्तासोबत अटी व शर्ती इत्यादींसाठी प्रक्रिया ठरवून कार्यकारी सूचना जारी करत आहे. असा युक्तिवाद केला जातो की २०१३ च्या नियमावलीच्या नियम ७० द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र सरकारने जारी केलेल्या कार्यकारी निर्देशांना कायद्याची बळकटी आहे.

विद्वान अतिरिक्त सरकारी वकील यांनी **(२०००) ८ एस.सी.सी. मध्ये पृष्ठ ६५५ वर प्रकाशित** '*क्वारी ओनर्स असोसिएशन -विरुद्ध- बिहार राज्य आणि इतर*' या प्रकरणामध्ये दिलेल्या न्यायनिर्णयाचा संदर्भ दिला.

८] अधिवक्ता श्री. मधुर देव आणि श्री. अमित किनखेडे हे सदर रिट याचिकेत कोणत्याही पक्षाचे प्रतिनिधित्व करत नसले, तरी त्यांनी निवेदन सादर केले आहे.

अधिवक्ता श्री. मधुर देव यांनी या न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने रिट याचिका क्र. ७०६५/२०१८ (मेसर्स श्री. हरिओम कृषी केंद्र -विरुद्ध- महाराष्ट्र राज्य आणि

इतर) आणि संबंधित प्रकरणामध्ये दिनांक २१/०२/२०२० रोजी पारित न्यायनिर्णयाचा संदर्भ दिला ज्यामध्ये विद्वान एकल न्यायाधीशांच्या निर्देशनावर द्विसदस्यीय खंडपीठाने असे मानले की १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(७) आणि ४८(८) मधील तरतुदींचा विशेष संविधि म्हणून अर्थ लावता येणार नाही आणि म्हणून १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(८) अंतर्गत पारित आदेशाला आव्हान देणे, हा मुंबई उच्च न्यायालयाच्या अपीलीय बाजूचे नियम, १९६० च्या अध्याय XVII च्या नियम १८ च्या हेतूंसाठी विशेष संविधि म्हणून पारित आदेश नसेल आणि १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(८) अन्वये दिलेल्या आदेशाला आव्हान देणारी याचिका या न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाने विचारात घ्यावी लागेल.

असा युक्तिवाद केला जातो की, १९५७ च्या अधिनियमाच्या कलम २१ आणि १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(७) आणि ४८(८) वेगवेगळ्या परिस्थितीत कार्य करतात. असाही युक्तिवाद केला जातो की, १९५७ च्या अधिनियमाच्या कलम २१ अंतर्गत शिक्षा केवळ फौजदारी खटल्याच्या समाप्तीवरच लागू केली जाऊ शकते आणि जेव्हा बेकायदेशीरपणे खनिजांची वाहतूक करण्याचा गुन्हा करणाऱ्या व्यक्तीचा अपराधी मन सिद्ध होतो, परंतु १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(७) आणि ४८(८) अंतर्गत दंड करण्यासाठी "अपराधी मन" हा घटक स्थापित करण्याची आवश्यकता नाही. अधिवक्ता श्री. मधुर देव यांनी **ए. आय . आर. (२००४) एस.सी. मध्ये पृष्ठ २९१५ वर प्रकाशित** *कर्नाटक रेअर अर्थ आणि इतर -विरुद्ध- वरिष्ठ भूगर्भशास्त्रज्ञ, खाण आणि भूविज्ञान विभाग आणि इतर* या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयावर विश्वास दर्शवून असे सादर केले आहे की, १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(७) आणि ४८(८) अंतर्गत जप्त केलेले वाहन सोडण्यासाठी दंड आकारण्याची शिक्षा, १९५७ चा अधिनियम आणि २०१३ ची नियमावली अंतर्गत गुन्हा केल्याबद्दल झालेल्या शिक्षेशी समतुल्य असू शकत नाही.

अधिवक्ता श्री. अमित किनखेडे यांनी **२००५ (३) एएलएल एम आर मध्ये पृष्ठ ७९६ वर प्रकाशित** *मेसर्स मॉडर्न बिल्डर्स -विरुद्ध- महाराष्ट्र राज्य आणि इतर* या प्रकरणात सदर न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने दिलेल्या न्यायनिर्णयाचा संदर्भ दिला आणि असे

सादर केले की, १९५७ चा अधिनियम आणि १९६६ ची संहिता वेगवेगळ्या आणि विशिष्ट क्षेत्रात कार्यरत आहेत आणि त्यामुळे १९५७ च्या अधिनियमाच्या कलम २१(१) ते २१(५) च्या तरतुदी आणि १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(७) च्या तरतुदींमध्ये विरोधाचा प्रश्नच उद्भवत नाही.

९] अधिवक्ता श्री. कुलदीप महल्ले सदर याचिकेत कोणत्याही पक्षाचे प्रतिनिधित्व करत नसले, तरी त्यांनी निवेदन सादर केले. **२०११(५) एएलएल एम आर मध्ये पृष्ठ ८०३ वर प्रकाशित** *शंकर रघुनाथ जोग -विरुद्ध-तलाऊलीकर अँड सन्स प्रायव्हेट लिमिटेड आणि इतर* या प्रकरणात दिलेल्या न्यायनिर्णयाचा संदर्भ देऊन त्यांनी सादर केले की, जर संविधि दुर्बोध आढळली तर त्याचा अर्थ कायद्याची योजना लक्षात घेऊन लावला पाहिजे आणि कायद्याचे संपूर्ण वाचन केले पाहिजे.

१०] अधिवक्ता श्री. पी. व्ही. घारे याचिकेतील कोणत्याही पक्षाचे प्रतिनिधित्व करत नसले, तरी त्यांनी याचिकाकर्त्यांच्या युक्तिवादाचे समर्थन केले.

११] या न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १९/१२/२०१७ रोजी फौजदारी रिट याचिका क्रमांक ११०५/२०१७ (नेहा अनिल आग्रे विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर) मध्ये दिलेल्या निर्णया मध्ये असा युक्तिवाद करण्यात आला होता की, गौण खनिज उत्खननाचे अधिकार असलेल्या अभिहस्तांकित व्यक्ती म्हणजेच वाळू घाटाचा भाडेपट्टाधारकावर कार्यवाही झाली नसेल आणि वाहतूकदार जर गौण खनिज उत्खननाचे अधिकार असलेल्या अभिहस्तांकित व्यक्ती पेक्षा वेगळी व्यक्ती/संस्था असेल तर त्याच्यावर कार्यवाही करता येणार नाही. हा युक्तिवाद मान्य करण्यात आला. फौजदारी रिट याचिका क्रमांक ११०५/२०१७ मध्ये दिलेल्या न्यायनिर्णयाचा परिच्छेद क्रमांक ५ व ६ पुनरुत्पादित केला आहे :-

"५. याचिकाकर्त्याने मांडलेल्या युक्तिवादाला सामोरे जाण्यासाठी संहितेच्या ४८ व्या कलमातील (७) आणि (८) हे उपकलम, वर्तमान प्रकरणात आकर्षित होतात का

ह्याचा विचार करायला हवा. महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ कलम ४८ मधील उपकलम (७) आणि (८) खालीलप्रमाणे पुनरुत्पादित केले आहे :

"४८. **खाण आणि खनिजांवरील सरकारी हक्क :**

(१) ते (६)...

(७) कोणतीही व्यक्ती, कायदेशीर अधिकार नसताना, काम सुरु असणाऱ्या खाणी, पडीत खाणी, जुना कचरा, शेत, बंधारे (शेतातील बंधारे दुरुस्त करण्याच्या किंवा बांधण्याच्या विनंतीवरून किंवा इतर कोणत्याही विनंतीवरून), नाले, खाडी, नदीपात्र किंवा अशा इतर ठिकाणांहून जिथे राज्य सरकारने अधिकार दिलेले नाहीत, कोणतेही खनिज, उत्खनन करेल, काढेल, गोळा करेल, बदलेल किंवा विल्हेवाट लावेल, तर त्याच्याविरुद्ध केल्या जाणाऱ्या इतर कोणत्याही कार्यवाहीच्या पद्धतीचा पूर्वग्रह न ठेवता, तो जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेल्या तहसीलदार पदाच्या खाली नसलेल्या कोणत्याही महसूल अधिकाऱ्याच्या लेखी आदेशावर अशा प्रकारे, उत्खनन केलेल्या, काढल्या गेलेल्या, गोळा केलेल्या, बदललेल्या, उचललेल्या किंवा विल्हेवाट लावलेल्या खनिजांच्या बाजारमूल्याच्या पाचपट रकमेचा दंड भरण्यास जबाबदार ठरेल.

[***]

“[(८) (१) उप-कलम (७) मधील तरतुदीत कोणताही पूर्वग्रह न बाळगता, जिल्हाधिकारी किंवा या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या वतीने प्राधिकृत केलेल्या तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही महसूल अधिकारी, उप-कलम (७) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही खाण, खदान किंवा इतर ठिकाणाहून उत्खनन केलेले, काढून टाकलेले, गोळा केलेले, बदललेले, उचललेले किंवा फेकून दिलेले कोणतेही खनिज ज्याला राज्य सरकारने अभिहस्तांकित केलेले नाही, जप्त करू शकेल आणि गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, काढून टाकणे, संग्रह करणे, बदलणे, उचलणे किंवा विल्हेवाट लावणे ह्यासाठी वापरण्यात येणारी कोणतीही वाहतूक यंत्रणा आणि उपकरणे आणि वाहतुकीचे कोणतेही साधन जप्त करू शकेल.

(२) गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, काढणे, संग्रह करणे, बदलणे, उचलणे किंवा विल्हेवाट लावणे किंवा त्यांची वाहतूक करण्यासाठी वापरली जाणारी अशी यंत्रणा किंवा उपकरणे किंवा वाहतूक साधने उप-कलम (१) अन्वये जप्त केलेले साहित्य जप्त केल्यापासून ४८ तासांच्या कालावधीत जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्याने यासंदर्भात प्राधिकृत केलेल्या उप-जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांसमोर सादर करावे, जो अशा जप्त केलेल्या यंत्रसामग्री, उपकरणे किंवा वाहतुकीचे साधन मालकाने विहित दंडाची रक्कम भरल्यानंतर आणि जप्त केलेली यंत्रसामग्री, उपकरणे किंवा वाहतुकीच्या साधनांच्या बाजारमूल्य मूल्यापेक्षा जास्त नसलेल्या रकमेच्या वैयक्तिक बाँडवर, ज्यामध्ये अशा जप्त केलेल्या यंत्रसामग्री, उपकरणे किंवा वाहतुकीचे साधन भविष्यात अनधिकृत उत्खनन, काढून टाकणे, संग्रह करणे, बदलणे, उचलणे किंवा विल्हेवाट लावणे आणि त्याची वाहतूक करण्यासाठी वापरले जाणार नाही असे नमूद करून, सोडून देऊ शकेल.]”

६. कोणत्याही व्यक्तीने कायदेशीर अधिकाराने खनिजांचे, इथे वाळूचे, उत्खनन केल्यास किंवा काढल्यास, उपरोक्त तरतुदी अजिबात आकर्षित होत नाहीत. राज्य सरकारकडून असा अधिकार मिळालेला नसताना, जेंव्हा एखाद्या व्यक्तीद्वारे गौण खनिजाचे उत्खनन केले जाते तेव्हा ह्या तरतुदी आकर्षित होतात. राज्य सरकारद्वारे नियुक्त केलेल्या क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्रातून उत्खनन केल्यास ह्या तरतुदी आकर्षित होतात. जर खनिज वाहतूकदार हा उत्खननाच्या अधिकार असलेल्या अभिहस्तांकित व्यक्ती पेक्षा वेगळा कुणी असेल तर त्याच्यावर अनधिकृतपणे वाळू उपसा केल्याबद्दल, वरील तरतुदींनुसार, गुन्हा दाखल करता येणार नाही, जोपर्यंत अभिहस्तांकित व्यक्तीद्वारे केलेला वाळू उपसा अनधिकृत आणि बेकायदेशीर असल्याचे दाखवले जात नाही. ही तरतुद, वाहून नेण्यासाठी परवानगी असलेल्या वजनापेक्षा जास्त खनिजे वाहून नेणारी संबंधित वाहने जप्त करण्याचा अधिकार प्रतिवादींना देत नाही."

१२]  फौजदारी रिट याचिका क्रमांक ११०५/२०१७ मध्ये उपस्थित करण्यात आलेल्या आव्हानाप्रमाणेच, आव्हान देणाऱ्या सध्याच्या रिट याचिकेवर विचार करताना खंडपीठाने

फौजदारी रिट याचिका क्रमांक ११०५/२०१७ चा विचार करताना घेतलेल्या मताशी सहमत होण्यास असमर्थता दर्शविली आणि हा मुद्दा पूर्ण न्यायाधीशमंडळाकडे विचारार्थ पाठवला. यापूर्वी लक्षात घेतल्याप्रमाणे, संदर्भ देताना खंडपीठाने हा मुद्दा विचारार्थ निश्चित केला नव्हता आणि २४/११/२०२० च्या आदेशानुसार विचारार्थ मुद्दे तयार करण्यात आले.

१३] रिट याचिकेत १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(७) आणि ४८(८) च्या तरतुदींच्या वैधतेला आणि/किंवा घटनात्मकतेला कोणतेही आव्हान देण्यात आलेले नाही हे नोंद करणे इथे समर्पक आहे. १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(७) आणि ४८(८) च्या तरतुदी बेकायदेशीर किंवा घटनाबाह्य आहेत असा याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद नाही. याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद असा आहे की १९५७ चा कायदा आणि २०१३ चे नियम दगडखाण पट्टे, खाण पट्टे किंवा इतर खनिज सवलती देण्याच्या नियमनाच्या सर्व परिस्थितीशी संबंधित आहेत आणि १९५७ च्या कायद्याच्या कलम १५ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन तयार केलेल्या २०१३ च्या नियमांमध्ये गौण खनिजांच्या उत्खननाचे नियमन, दगडखाण भाडेपट्ट्यांच्या मंजूरीची प्रक्रिया, दगडखाण भाडेपट्ट्यांच्या अटी आणि शर्ती, गौण खनिजांसाठी खाण परवाने मंजूर करणे, सार्वजनिक लिलावाद्वारे सवलत मंजूर करणे, गौण खनिजांचा साठा करणे आणि विक्री, २०१३ च्या नियमातील तरतुदींचे उल्लंघन करून अनधिकृत काम केल्याबद्दल गुन्हे, दंड आणि खटला चालविणे, विविध प्राधिकरणांना अपील, पुनरिक्षण आणि पुनर्विलोकन ह्यांचा समावेश आहे. २०१३ चे नियम हे संपूर्ण संहिता असल्यामुळे १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(७) आणि ४८(८) च्या तरतुदींना आव्हान देऊन वाहतूक करणाऱ्यांना दंड आकारला जाऊ शकत नाही, असा युक्तिवाद करण्यात आला आहे. पर्यायी युक्तिवाद असा आहे की अधिकाऱ्यांनी भाडेपट्ट्याच्या धारकाविरुद्ध कोणतीही कारवाई केली नाही आणि म्हणूनच १९६६ च्या संहितेच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन/भंग झाले आहे असे म्हणता येणार नाही आणि परिणामी भाडेपट्ट्याच्या धारकांबरोबर कायदेशीर आणि वैध करारांतर्गत वाळू वाहतूक करणाऱ्या याचिकाकर्त्यांवर कारवाई केली जाऊ शकत नाही. याचिकाकर्त्यांच्या विद्वान वकिलांनी विस्तृत निवेदन केले असले तरी, आम्ही या युक्तिवादाशी सहमत नाही, विशेषतः

जेंव्हा १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(७) आणि ४८(८) च्या तरतुदींच्या वैधतेला आणि घटनात्मकतेला कोणतेही आव्हान दिलेले नाही. १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(७) आणि ४८(८) च्या तरतुदी कोणत्या प्रसंग आणि परिस्थितीत मधे लागू होतात हे स्पष्ट केलेले नाही. अशी परिस्थिती असू शकत नाही की कायदेशीर तरतूद अस्तित्वात आहे परंतु शून्यवत आणि अप्रवर्ति आहे.

१४] मेसर्स मॉडर्न बिल्डर्स - विरुद्ध - महाराष्ट्र राज्य आणि इतर(वर उल्लेखित) या खटल्यात दिलेल्या न्यायनिर्णयात, या न्यायालयाच्या खंडपीठाने १९६६ च्या संहितेच्या कलम ४८ (७) मधील तरतुदी घटनेच्या विरोधात असल्याचा युक्तिवाद फेटाळून लावला आहे कारण राज्य विधिमंडळ या विषयावर कोणताही कायदा करण्यास सक्षम नाही, विशेषत: जेंव्हा घटनेच्या सातव्या अनुसूचीच्या सूची एक मध्ये केंद्र सरकारच या विषयावर कायदा करण्यास सक्षम आहे असे नमूद आहे. ह्या न्यायालयाच्या खंडपीठाने मेसर्स मॉडर्न बिल्डर्स - विरुद्ध - महाराष्ट्र राज्य आणि इतर(वर उल्लेखित) चा निर्णय देताना नोंद केली की १९५७ चा कायदा आणि १९६६ ची संहिता वेगवेगळ्या आणि विशिष्ट क्षेत्रात लागू होतात. १९६६ च्या संहितेचा उद्देश महसूल प्रशासन हा आहे आणि महसुलाचे मूल्यांकन, शुल्क आकारणे आणि गोळा करण्याचे अधिकार समाविष्ट आहेत. त्यात राज्य सरकारकडे असलेल्या खनिजांच्या बेकायदेशीर उत्खननामुळे दंड आकारणी आणि जर अशा खनिजांना अनधिकृतपणे काढण्यात आले असेल तर कायद्यांतर्गत विनिर्दिष्ट प्राधिकरणांनच दंड आकारतील. १९५७ च्या कायद्याच्या कलम २१ च्या उप-कलम (१) ते (५) मध्ये तरतूद केलेल्या दंडाच्या स्वरूपात तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्हीचा समावेश आहे आणि १९६६ च्या संहितेच्या कलम ४८ च्या तरतुदी जिल्हाधिकाऱ्यांना, प्रतिबंधित कृत्य ज्यामुळे राज्य सरकारला झालेल्या नुकसानाची भरपाई, दंड आकारण्याचे स्वरूपात घेण्याचे अधिकार देतात. असे कुणाचेच म्हणणे नाही की ह्या न्यायालयाच्या खंडपीठने मेसर्स मॉडर्न बिल्डर्स – विरुद्ध - महाराष्ट्र राज्य आणि इतर(वर उल्लेखित) मध्ये दिलेल्या न्यायनिर्णयात कायद्याच्या अचूकतेबद्दल कुणाला आजपावेतो काही शंका आली आहे. मेसर्स मॉडर्न बिल्डर्स- विरुद्ध - महाराष्ट्र राज्यआणि इतर (वर उल्लेखित) या खटल्यात दिलेला निकालाकडे फौजदारी रिट

याचिका क्रमांक ११०५/२०१७ चा निकाल देणाऱ्या खंडपीठाचे लक्ष वेधण्यात आले नाही. आमच्यासमोर युक्तिवादाच्या वेळी देखील एकाही वकिलाने कोणतेही असे निवेदन दिले नाही ज्यामुळे मेसर्स मॉडर्न बिल्डर्स - विरुद्ध -महाराष्ट्र राज्यआणि इतर (वर उल्लेखित) मध्ये सुनावलेल्या न्यायनिर्णयमधे नमूद केलेल्या कायद्याच्या अचूकते बद्दल शंका निर्माण व्हावी.

१५] १९९५ (१) महाराष्ट्र लॉ रिपोर्टर मधील पान ६७९ वर हरि कन्स्ट्रक्शन -विरुद्ध - महाराष्ट्र राज्य व इतर या खटल्यात या न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या आणखी एका निर्णयात, १९५७ चा कायदा हा तरतूद केलेल्या मर्यादेपर्यंत खाणींचे व खनिजांचे केंद्र सरकार द्वारे नियमन करण्यासंदर्भात आहे. असे मानले आहे की, १९५७ च्या कायद्यात इतर खनिजांपेक्षा गौण खनिजांबाबत वेगळे नियम आहेत आणि जरी गौण खनिजांबाबत कायद्याचा विषय १९५७ च्या कायद्यात समाविष्ट आहे, तरीही तो केवळ विशिष्ट मर्यादेपर्यंत आहे आणि त्या मर्यादेपर्यंत राज्य विधानमंडळ कोणताही कायदा लागू करण्यास सक्षम नाही. १९६६ च्या संहितेचा उद्देश महसूल प्रशासन हा आहे ज्यात मूल्यांकन, शुल्क आकारणी आणि महसूल गोळा करणे समाविष्ट आहे ज्यात गौण खनिजांच्या बेकायदेशीरपणे उत्खननासाठी दंड आकारणे समाविष्ट असेल. असे मानले आहे की, महसूल प्रशासनात राज्य सरकारकडे असलेल्या खनिजांच्या अनधिकृत उत्खननासाठी दंड आकारण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा अधिकार समाविष्ट आहे आणि घटनेच्या सातव्या अनुसूचीच्या यादी दोनमध्ये येत असल्याने या विषयावर कायदा करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळाला आहे. पुन्हा, एकाही वकिलाने हरि कन्स्ट्रक्शन- विरुद्ध - महाराष्ट्र राज्य व इतर (वर उल्लेखीत) मधे या खंडपीठाने दिलेल्या न्यायनिर्णयच्या अचूकते बाबत आजपर्यंत शंका उपस्थित करण्यात आली असे निर्देशनास आणून दिले नाही आणि ह्या न्यायालयाच्या खंडपीठने मेसर्स मॉडर्न बिल्डर्स – विरुद्ध - महाराष्ट्र राज्य आणि इतर(वर उल्लेखित) मध्ये दिलेल्या न्यायनिर्णयात कायद्याच्या अचूकतेबद्दल, आमच्या समोर एकाही वकिलाने कोणतीही शंका उपस्थित केली नाही.

१६] या न्यायालयाच्या खंडपीठाने हरी कन्स्ट्रक्शन विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर(वर उल्लेखित) आणि मेसर्स मॉडर्न बिल्डर्स विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर(वर उल्लेखित) या खटल्यांचा निकाल देताना मांडलेले मत म्हणजेच १९५७ चा कायदा आणि १९६६ ची संहिता वेगवेगळ्या क्षेत्रांत कार्यरत आहे ह्यापासून विचलित होण्याचे कारण दिसत नाही.

१७] १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(८)(१) नुसार अनधिकृतरित्या काढलेल्या गौण खनिजांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे वाहतुकीचे कोणतेही साधन जप्त करण्याचा अधिकार प्राधिकरणांना देण्यात आला आहे. १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(८)(२) मध्ये गौण खनिज अनधिकृतरित्या उत्खननासाठी वापरली जाणारी वाहतूक साधने जप्त केल्यानंतर अवलंबण्यात येणाऱ्या यंत्रणेचा उल्लेख आहे. याआधी नमूद केल्याप्रमाणे, १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(८)(१) आणि ४८(८)(२) च्या तरतुदींच्या वैधता आणि/किंवा घटनात्मकतेला कोणतेही आव्हान नाही. त्यामुळे, केवळ वाहतूकदाराच्या विरोधात कारवाई करता येणार नाही, असा युक्तिवाद, स्वीकारले जाऊ शकत नाही. या निवेदनातील आणखी एक वितर्क म्हणजे एखादा गुन्हेगार केवळ दुसऱ्या गुन्हेगारावर कारवाई केली गेली नाही म्हणून त्याच्याविरोधात कारवाई केली जाऊ शकत नाही असे म्हणू शकत नाही. भारतीय घटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत असामान्य अधिकारक्षेत्राचा वापर करून, सहगुन्हेगारावर कारवाई केली जात नाही, केवळ याच आधारावर गुन्हेगाराला मुक्त करणे अत्यंत अनुचित आणि धोकादायक ठरेल. याशिवाय, भारतीय घटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत असामान्य अधिकार क्षेत्राचा वापर करणे आणि सह-गुन्हेगारा विरुद्ध कारवाई न केल्यामुळे सह-गुन्हेगाराची सुटका करणे यामुळे ही आदेशिका रद्द होईल आणि केवळ गुन्हेगाराची सुटकाच नाही तर अश्या सह-गुन्हेगाराचे संरक्षण देखील होईल ज्यांच्याविरोधात सक्षम प्राधिकरणाने नंतर देखील कारवाई केली असती. सर्व दोषींवर एकाच वेळी कारवाई करण्याची आणि जर असे केले नाही तर एका विशिष्ट दोषीविरोधात कारवाई सुरू केली जाऊ शकत नाही, अशी जबाबदारी संबंधित प्राधिकरणावर टाकणारी कोणतीही तरतूद याचिकाकर्त्यांना निदर्शनास आणता आली नाही. ह्या न्यायालयाच्या खंडपीठाने फौजदारी रिट याचिका ११०५/२०१७ वर निर्णय देताना या सर्व बाबींचे परीक्षण

करण्यात अपयशी ठरले आणि याचिकाकर्त्याच्या वतीने सादर केलेले निवेदन कोणतेही कारण न देता स्वीकारले असे आढळले आहे.

१८] म्हणूनच आम्ही असे मानतो की, १९६६ च्या संहितेच्या कलम ४८(७) आणि ४८(८) चा वापर वाहतूकदारांविरोधात देखील केला जाऊ शकतो, जरी उत्खननाचा हक्क असलेल्या विरुद्ध कार्यवाही केली गेली नसली तरीही. १९६६ च्या संहितेच्या कलम ४८ (८) नुसार विहित केलेल्या दंडास वाहतूकदार जबाबदार आहे की नाही हे वाहतूकदाराकडून वाहतूक परमिटच्या कोणत्याही अटीचे उल्लंघन करण्यासंदर्भातील तथ्यात्मक बाबींवर अवलंबून १९६६ च्या संहितेनुसार सक्षम प्राधिकरणाच्या निर्णयाच्या निकालावर अवलंबून असेल. त्यानुसार आम्ही संदर्भाला उत्तर देतो की फौजदारी रिट याचिका क्रमांक ११०५/२०१७ (नेहा अनिल अग्रे विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर) मधील न्यायनिर्णय परिच्छेद ६ मधील प्रस्ताव कायद्याची अचूक स्थिती दर्शवत नाही असे जाहीर करतो.

१९] गुणवत्तेच्या आधारे याचिकेवर निर्णयासाठी कागदपत्रे योग्य खंडपीठासमोर ठेवली जावीत.

(न्या. मनीष पितळे ) (न्या. झेड. ए. हक.) (न्या. सुनील बी.शुक्रे)

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".